# विकसित भारतासाठी कष्ट

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे प्रतिपादन, राज्यसभेत काँग्रेसवर टीका

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नवी दिल्ली :** काँग्रेसची द्वेषाची संस्कृती देशाच्या विकासाच्या आड येत असून, 'एनडीए'चे सरकार मात्र देशाला २०४७ मध्ये विकसित भारत बनवण्यासाठी कष्ट करत आहे. हाच दोन राजकीय संस्कृतीतील फरक आहे, असल्याची टीका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी राज्यसभेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील चर्चेवेळी केली.

काँग्रेसने देशाला विकासापासून वंचित ठेवले होते. त्यांना देशाची लोकसंख्या विकासातील अडथळा वाटत होती. पं. नेहरूंनी तेव्हा असलेली ३५ कोटी जनता ही समस्या मानली होती. इंदिरा गांधींनीही नेहरूंच्या पावलावर पाऊल टाकत, ५७ कोटी जनतेला समस्या मानले होते. पण, आम्ही १४० कोटी जनता समस्या मानत नाही. ही लोकसंख्या म्हणजे माझ्याकडे देशाला विकसित बनवण्यासाठी असलेले १४० कोटी उत्तरे आहेत. हेच देशवासी उज्ज्वल भविष्य आहेत, तेच देशाचे कर्ताधर्ता आहेत, असे मत मोदींनी व्यक्त केले.

काँग्रेसच्या कार्यसंस्कृतीवरही मोदींनी सडकून टीका केली. काँग्रेसच्या कुठल्याही पंतप्रधानांचे लालकिल्यावरील भाषण वाचा, त्यामध्ये 'गरिबी हटाओ'चा नारा दिला नाही असे एकही भाषण नाही. पण, गरिबी कमी झालीच नाही. काँग्रेसची सरकारे फक्त सुपीक कल्पना मांडत पण, त्याची अंमलबजावणी कधीही केली नाही. ९० कोटींच्या प्रकल्पाची किंमत ९० हजार कोटींवर गेली तरी काँग्रेसला काहीही वाटते नाही. मी जन्माला आलो तेव्हा सरदार पटेलांनी नर्मदेवर सरदार सरोवर धरण बांधण्याचा प्रकल्प होता घेतला होता, पण, कित्येक वर्षांनी मी पंतप्रधान झाल्यावर त्या धरणाचे उद्घाटन मी केले, अशी उपहासात्मक टीका मोदींनी केली.



### 'डील'वरून कोपरखळी

आम्ही 'डील' करतो तेव्हा आमच्या व्यापारी कराराचे जग कौतुक करते, भारताकडे आशेने पाहते. काँग्रेसच्या काळातील 'डील'चा उच्चार करताच 'बोफोर्स डील'ची आठवण येते, अशी कोपरखळी नरेंद्र मोदी यांनी मारली.

### राहुल गांधींना टोमणा

'एनडीए' सरकारच्या काळात विकासकामे प्रत्यक्षात आल्याचा दावा मोदी यांनी केला. आम्ही २५ कोटी जनतेला गरिबीतीतून मुक्त केले. 'मेक इंडिया' गतिमान झाले आहे. दर्जदार उत्पादने बनू लागली. आम्ही काही कोटी स्टर्टअप सुरू केल्या आहेत, काँग्रेसच्या काळात स्टार्टअप हा शब्दही नव्हता. काँग्रेसला कुटुंबातील एक स्टार्टअपदेखील चालवता येत नाही, असे म्हणत मोदींनी राहुल गांधींना टोमणा मारला.

### 'भारत जगाचा विश्वमित्र'

- काँग्रेसच्या काळात सार्वजनिक उपक्रम रसातळात गेले होते. एलआयसी, स्टेट बँक, 'एचएएल'सारख्या सरकारी कंपन्या तोट्यात गेल्या होत्या. पण, आता हेच सार्वजनिक उपक्रम 'मेक इन इंडिया'साठी उत्प्रेरक बनले आहेत, असे मोदी म्हणाले.
- आज जग भारताशी करार करण्यास उत्सुक आहे. युरोपियन युनियन आणि अमेरिकेशी केलेल्या करारामुळे जगाच्या अर्थकारणामध्ये स्थैर्य निर्माण झाल्याचा विश्वास जगाला वाटू लागला आहे. भारत जगाचा विश्वमित्र बनत असल्याचे मोदींनी सांगितले.
- पूर्वी वारंवार 'इंडिया मिस द बस' असे म्हटले जात होते. पण, आता भारत कुठलीही बस 'मिस' करत नाही. भारत जगाचे नेतृत्व करत आहे. जग भारताकडे झुकू लागले आहे, असा विश्वास मोदींनी व्यक्त केला.

# लोकसभेतील नरवणे वाद राज्यसभेत

## राहुल गांधींना न बोलू दिल्यावरून खडाजंगी, काँग्रेसचा सभात्याग

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नवी दिल्ली :** माजी लष्करप्रमुख मनोज नरवणे यांचे अप्रकाशित पुस्तक आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना भाषण पूर्ण करण्यास केलेली मनाई, यावरून गेले चार दिवस सुरू असलेला वाद गुरुवारी लोकसभेतून राज्यसभेत आला. त्यावरून वरिष्ठ सभागृहातील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे आणि सभागृहाचे नेते जे. पी. नड्डा यांच्यामध्ये खडाजंगी झाली.

बाळबोध (राहुल) नेत्याने काँग्रेसला ओलिस ठेवल्याचा आरोप नड्डांनी केल्यानंतर खरगेंनी, अख्ख्या भाजपला मोदींनी घेरले असून त्यांच्या परवानगीशिवाय तुम्ही काहीही करू शकत नाही, असे प्रत्युत्तर दिले. वाद टोकाला गेल्यानंतर विरोधीपक्षांच्या सदस्यांनी सभात्याग केला.

राज्यसभेचे कामकाज सुरू होताच खरगेंनी लोकसभेत राहुल गांधींना बोलू न दिल्याचा मुद्दा उपस्थित केला. त्यांनी जनरल नरवणेंच्या पुस्तकाचा उल्लेख करून त्यातील काही परिच्छेद वाचून दाखवण्याची प्रयत्न केला. त्यामुळे लोकसभेप्रमाणे राज्यसभेतही सत्ताधारी सदस्य आक्रमक झाले. केंद्रीय संसदीय कामकाजमंत्री किरेन रिजिजू व केंद्रीयमंत्री जे. पी. नड्डा यांनी खरगेंनी तीव्र विरोध केला.

लोकसभेतील मुद्दे राज्यसभेत उपस्थित केले जाऊ शकत नाहीत. दोन्ही सदनांना स्वतःच्या प्रक्रिया, नियम आणि परंपरा आहेत. त्याचे पालन केले पाहिजे, असे रिजिजू म्हणाले. राज्यसभेचे सभापती सी. पी. राधाकृष्णन यांनीही खरगेंना हा मुद्दा उपस्थित न करण्याची विनंती केली. मात्र, खरगेंनी वारंवार हा मुद्दा मांडण्याचा प्रयत्न केला.

राहुल गांधी बाळबोध असल्याच्या नड्डा यांच्या टिप्पणीवर काँग्रेसच्या खासदार प्रियंका गांधी-वढेरा यांनी तीव्र टीका केली. कोणाबद्दलही बोलायची ही काही पद्धत आहे का? राहुल गांधींना बोलण्याची परवानगी दिली पाहिजे. त्यांना (मोदी) कशाची भीती वाटते? असा सवाल त्यांनी केला.

### नड्डांचे आरोप



१. विरोधी पक्षनेत्यांना माहीत असले पाहिजे की, लोकसभेच्या कामकाजावर राज्यसभेत चर्चा केली जाऊ शकत नाही. केंद्र सरकार सर्व चर्चांसाठी तयार आहे. लोकसभेत पंतप्रधान बोलण्यास तयार होते, पण, विरोधकांनी सभागृह चालू दिले नाही.

२. लोकशाही धोक्यात असल्याचा आरोप करणे चुकीचे आहे. उलट, काँग्रेस नेतृत्वाने पक्ष अधिक लोकशाही पद्धतीने चालवला पाहिजे. काही गोष्टी लोकशाही पद्धतीनेच व्हायला हव्यात हे लक्षात घेतले पाहिजे. एका बाळबोध मुलाच्या हाती काँग्रेस ओलीस ठेवू नका, असे नड्डा म्हणाले.

### खरगेंचे प्रत्युत्तर



१. दोन्ही सभागृहे मिळून संसद बनते. हे संसदेचे दोन खांब आहेत. त्यामुळे लोकसभेतील मुद्द्यांची राज्यसभेत दखल घेतली जाऊ शकते, असा प्रतिवाद खरेग यांनी केला. लोकसभेचे विरोधी पक्षनेते असतानाही राहुल गांधींना बोलू दिले जात नाही, हे लोकशाहीविरोधी आहे. केंद्र सरकारने लोकशाही धोक्यात आणल्याचा आरोप खरगे यांनी केला.

२. सभापती राधाकृष्णन यांनी खरगेंना बोलण्याची संधी दिली असली तरी, लोकसभेतील मुद्द्यांवर मतप्रदर्शन न करण्याची विनंती खरगेंनी धुडकावून लावली.

## 'माझी कबर खणण्याचा काँग्रेसचा प्रयत्न'

**(पान १ वरून)** देशाला विकासापासून वंचित ठेवले होते, आता मात्र देश विकसित होण्याकडे वेगाने धावू लागला आहे, असा विश्वास मोदी यांनी व्यक्त केला. काँग्रेस मला २००२ पासून म्हणजे २५ वर्षे शिव्या घालत आहे. मी पंतप्रधान नव्हतो तेव्हाही संसदेचे एकही अधिवेशन असे नव्हते जिथे मला शिव्या घातल्या गेल्या नाहीत. मी पंतप्रधान झालो ही बाब काँग्रेसला खुपते. मी पंतप्रधान झालो पण, इतकी वर्षे या पदावर टिकून कसा, याचेही त्यांना आश्चर्य वाटते. त्यांना माझा द्वेष करण्याशिवाय दुसरा मार्ग सापडत नाही म्हणून काँग्रेसला माझी कबर खोदायची आहे, असे शरसंधान मोदींनी साधले. आम्ही अनुच्छेद ३७० रद्द केले, ईशान्येकडील राज्यामध्ये दहशतवाद संपवून शांतता प्रस्थापित केली, पाकिस्तानात घुसून दहशतवादी अड्डे नष्ट केले. ऑपरेशन सिंदूर केले, माओवाद्यांच्या मुसक्या आवळण्यासाठी धाडसी पावले उचलली हे सगळे देशहितासाठी मी करत आहे म्हणूनच काँग्रेसला माझी कबर खोदायची आहे, अशी टीका मोदींनी केली.

**लोकशाहीविरोधी वर्तन**

लोकसभेमध्ये काँग्रेसच्या खासदारांनी केलेला गदारोळ, पीठासीन अधिकाऱ्याच्या दिशेने भिरकावलेले कागदाचे कपटे आदी घटनांचा संदर्भ देत, काँग्रेस संविधान-लोकशाहीविरोधी असल्याचा आरोप मोदींनी केला. राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील चर्चेत अडथळा आणून काँग्रेसने आदिवासी महिला राष्ट्रपतीचा अपमान केला आहे. संविधान शब्द उच्चारण्याचाही अधिकार काँग्रेसला नाही. संसद हे लोकशाहीचे पवित्र मंदिर असून त्याचाही काँग्रेसने अपमान केला आहे, असा प्रहार मोदींनी केला. काँग्रेसच्या खासदारांनी कपटे फेकली तेव्हा पीठासीन अधिकारी म्हणून भाजपचे आसामचे खासदार दिलीप सैकिया काम पाहात होते. हा त्यांचाच नव्हे आसामचा अपमान झाला आहे. त्यांच्यानंतर कृष्णाप्रसाद तेन्नेटी काम पाहात होते, त्यांच्याशी गैरवर्तवणूक करून काँग्रेसने दलित सदस्याचा अपमान केला आहे.

## लोकसभेत पंतप्रधानांना धोका!

**(पान १ वरून)** अभिभाषणाला उत्तर देणार होते, तेव्हा मला माहिती मिळाली होती की, काही काँग्रेस खासदार पंतप्रधानांच्या खुर्चीजवळ एखादी अनुचित घटना घडवू शकतात. जर अशी घटना घडली असती, तर देशाच्या लोकशाही परंपरेच्या चिंधड्या उडाल्या असत्या. हे टाळण्यासाठी, मी पंतप्रधानांना सभागृहात न येण्याची विनंती केली, असे बिर्ला म्हणाले. काही खासदारांनी लोकसभा सभागृहात गैरवर्तन केले होते, काँग्रेसच्या नेतृत्वाखाली विरोधी पक्षाचे खासदार पंतप्रधानांच्या भाषणादरम्यान गोंधळ घालण्याचा प्रयत्न करू शकतात, अशी पूर्वमाहिती मिळाली होती.

**आवाजी मतदानाने प्रस्ताव मंजूर**

राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील चर्चेला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारीही लोकसभेत उत्तर दिले नाही. त्यामुळे पंतप्रधानांच्या उत्तराविना चर्चेचा प्रस्ताव गुरुवारी लोकसभेत आवाजी मतदानाने मंजूर करण्यात आला. २००४ नंतर पहिल्यांदाच राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील चर्चेचा प्रस्ताव पंतप्रधानांचे भाषण न होताच मंजूर झाला.

IDEMI
GOVERNMENT OF INDIA
Ministry of Micro, Small and Medium Enterprises
INSTITUTE FOR DESIGN OF ELECTRICAL MEASURING INSTRUMENTS, MUMBAI
वैद्युतिक मापन उपयंत्र अभिकल्प संस्थान, मुंबई
Government Certificate course on
ARTIFICIAL INTELLIGENCE & DATA SCIENCE
Course Time 7.30 PM TO 8.30 PM
ऑनलाइन ONLINE
Course Duration: 8 Days
Course Date- 15 Feb. TO 22 Feb. 2026
Email ID: training@idemi.org Website: www.idemi.org
Content: Introduction to Artificial intelligence, data science, Data Wrangling & Cleaning Techniques (with practical), Exploratory Data Analysis (EDA), Feature Engineering & Selection Introduction to Machine learning with supervised and unsupervised learning approaches, with ethics and future.
Course Fees Regular 3000 +18 % GST Course Fees Student 2000 + 18% GST
(Fees are not refundable)
Data preprocessing (Full Hands on)
Exploratory data analysis (Full Hands on)
हमें कॉल करें / Call us between 10 am to 6 pm
Contact - 8007765693, 9403566219, 9699772711, 9869087617

MCXCCL
मल्टी कमॉडिटी एक्स्चेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय :- एक्स्चेंज स्क्वेअर, सीटीएस २५५, सुरेन रोड, चकाला, अंधेरी (पू.), मुंबई-४०००९३.
सीआयएन : U74999MH2008PLC185349; ईमेल आयडी : ig-mcxccl@mcxccl.com; वेबसाइट : https://www.mcxccl.com
सूचना
सूचना याद्वारा देण्यात येते की, कंपनीची ज्यादा सर्वसाधारण सभा ("ईजीएम") दिनांकित ०४ फेब्रुवारी, २०२६ "ईजीएम"च्या सूचनेमध्ये नमूद केल्यानुसार कामकाजावर विचारविनिमय करण्याकरिता व्हिडीओ कॉन्फरन्सिंग ("व्हीसी") / अदर ऑडिओ-व्हिज्युअल मिन्स ("ओएव्हीएम") द्वारा सोमवार, ०९ फेब्रुवारी, २०२६ रोजी दु.०४.०० वा (भाप्रवे) घेण्यात येणार आहे. निगम कामकाज मंत्रालयाद्वारा निर्गमित केलेल्या सर्क्युलर्सच्या अनुसार "ईजीएम" "व्हीसी" / "ओएव्हीएम"द्वारा घेण्यात येणार आहे.
उक्त सर्क्युलर्सच्या अनुसार, "ईजीएम"ची सूचना सर्व सदस्यांना कंपनीकडे नोंदणीकृत असलेल्या त्यांच्या ईमेल पत्त्यांवर ०४ फेब्रुवारी, २०२६ रोजी ईलेक्ट्रॉनिक प्रणालीत पाठविण्यात आली आहे. "ईजीएम"ची सूचना https://www.mcxccl.com/disclosures/announcement या कंपनीच्या वेबसाइटवर उपलब्ध आहे. "ईजीएम"मध्ये उपस्थित राहण्याबाबत सूचनांची उक्त "ईजीएम" सूचनेमध्ये तरतूद करून देण्यात आली आहे.
"ईजीएम"मध्ये विचारविनिमय करण्यात येणाऱ्या कामकाजाच्या आयटम्ससंबंधित कागदपत्रे सभेच्या तारखेपर्यंत पाहणीकरिता उपलब्ध असणार आहेत.
मंडळाच्या आदेशाद्वारा
मल्टी कमॉडिटी एक्स्चेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेडकरिता
स्वाक्षरी/-
मंदार कुलकर्णी
कंपनी सचिव
स्थळ : मुंबई
तारीख : ०४ फेब्रुवारी २०२६

Reliance Industries Limited
Growth is Life
नोंदणीकृत कार्यालय: ३रा मजला, मेकर चेंबर्स ४, २२२, नरिमन पॉइंट, मुंबई - ४०० ०२१.
दूरध्वनी: ०२२-३५५५ ५००० • फॅक्स: ०२२-२२०४ २२६८ • ई-मेल: investor.relations@ril.com
CIN: L17110MH1973PLC019786
सूचना
छापील स्वरूपातील समभागांचे हस्तांतरण आणि डिमटिरिअलायझेशन (डिमॅट) साठी विशेष खिडकी
कृपया याची नोंद घ्यावी की, सेबीचे परिपत्रक क्रमांक: एचओ/१३/११(२)२०२६-एमआयआरएसडी-पीओडी/आय/३७५०/२०२६ दिनांक ३० जानेवारी, २०२६ ("सेबी परिपत्रक") नुसार, छापील स्वरूपातील समभागांचे हस्तांतरण आणि डिमटिरिअलायझेशन (डिमॅट) यासाठी ४ फेब्रुवारी, २०२७ पर्यंत एक विशेष खिडकीखुली राहील.
ही सुविधा अशा गुंतवणुकदारांसाठी उपलब्ध आहे ज्यांनी १ एप्रिल, २०१९ पूर्वी रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड ("कंपनी") यांच्या छापील स्वरूपातील समभागांची खरेदी केली होती, आणि:
(ए) ज्यांनी हस्तांतरणासाठी समभाग सादर केले नव्हते, किंवा
(बी) हस्तांतरणासाठी समभाग दार केले होते, परंतू दस्तऐवजातील त्रुटींमुळे ते नाकारण्यात आले, परत करण्यात आले, किंवा त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले होते.
विशेष खिडकी यासाठी लागू आहे
१ एप्रिल, २०१९ पूर्वी ज्यांची अंमलबजावणी करण्यात आली होती अशा हस्तांतरण करारासाठी ही खिडकी लागू आहे का याविषयी अधिक स्पष्ट माहितीसाठी, गुंतवणुकदारांनी खालील माहिती पहावी:

| १ एप्रिल, २०१९ पूर्वी हस्तांतरणासाठी दाखल केले होते का? | मूळ शेअर प्रमाणपत्र गुंतवणूकदाराकडे उपलब्ध आहे का? | विशेष खिडकीत दाखल करण्यासाठी पात्र आहेत का? |
|---|---|---|
| नाही - हे नव्याने दाखल करावेत | होय | होय (सेबीच्या परिपत्रकात नमूद केलेल्या अटींच्या अधीन) |
| होय, परंतु ते पूर्वी नाकारण्यात आले होते/परत करण्यात आले होते | होय | |
| होय, दाखल करण्यात आले होते | नाही | नाही |
| नाही, दाखल करण्यात आले नव्हते | नाही | नाही |

कृपया नोंद घ्यावी की, मूळ शेअर प्रमाणपत्रांसोबत हस्तांतरण करारपत्रे आणि इतर सहाय्यक कागदपत्रे असलेल्या विनंत्यांचाच विशेष खिडकी अंतर्गत विचार केला जाईल.
ज्या गुंतवणूकदारांना विशेष खिडकीचा लाभ घ्यायचा आहे त्यांनी कंपनीचे रजिस्ट्रार व समभाग हस्तांतरण एजंट, केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड (युनिट: रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड), यांच्याशी संपर्क साधावा ज्यांचा पत्ता असा आहे: सेलेनियम टॉवर-बी, प्लॉट क्रमांक ३१ व ३२, गचीबोवली, फायनान्शियल डिस्ट्रिक्ट, नानाक्रमगुडा, हैदराबाद - ५०० ०३२.
अधिक माहितीसाठी गुंतवणूकदारांनी सेबीचे परिपत्रक पहावे, जे येथे उपलब्ध आहे: https://tinyurl.com/29ab3727.
काही चौकशी करायची असल्यास ती येथे पाठवावी: rilinvestor@kfintech.com
रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड करिता
स्वाक्षरी/-
सावित्री पारेख
कंपनी सेक्रेटरी आणि कम्प्लायन्स ऑफिसर
स्थळ : मुंबई
दिनांक : ६ फेब्रुवारी, २०२६
www.ril.com

महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा)
(महाराष्ट्र शासनाची संस्था)
विभागीय कार्यालय, अमरावती
विभागीय क्रीडा संकुल, मोर्शी रोड, अमरावती - 444603
दूरध्वनी क्र. : 0721-2661610, ई-मेल : dgmamravati@mahaurja.com,
ई-निविदा सूचना
जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण), सन 2025-26 अंतर्गत जिल्हा परिषद, अकोला अधिनस्त विविध ०८ ग्रामपंचायतींच्या सार्वजनिक पाणी पुरवठा योजनेवर १० एच.पी. (डी.सी.) क्षमतेचे एकुण ०८ सौर पंप (कुंपनासह), 5 वर्षाच्या हमी कालावधीसह तसेच सर्व समावेशक देखभाल, दुरुस्तीच्या करारासह (CMC) आणि दुरःस्थ निगराणी प्रणालीसह (RMS) आस्थापित व कार्यान्वित करणेकरिता नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय, भारत सरकार यांच्या अधिकृत चाचणी केंद्राद्वारे प्रमाणित केलेल्या सौर पंप उत्पादक / इंटिग्रेटर / अधिकृत पुरवठादार कडून निविदा मागविण्यात येत आहे.
ई-निविदेच्या संबंधीतची सविस्तर माहितीसाठी www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर भेट द्यावी. प्राप्त होणाऱ्या निविदांपैकी एक किंवा सर्व निविदा स्विकारण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार विभागीय महाव्यवस्थापक, महाऊर्जा, अमरावती यांचे कडे राखीव राहतील.
विभागीय महाव्यवस्थापक

TATA
टाटा कॅपिटल लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय: ११ वा मजला, टॉवर ए, पेनिन्सुला बिझनेस पार्क, गणपतराव कदम मार्ग, लोअर परेल, मुंबई - ४०००१३ दूरध्वनी क्रमांक: ०२२-६६०६ ९०००
कॉर्पोरेट ओळख क्रमांक: L65990MH1991PLC060670 वेबसाइट: www.tatacapital.com
शाखा कार्यालय बंद आणि स्थलांतराबाबत सार्वजनिक सूचना
टाटा कॅपिटल लिमिटेड (कंपनी), ज्याचे नोंदणीकृत कार्यालय ११वा मजला, टॉवर ए, पेनिन्सुला बिझनेस पार्क, गणपतराव कदम मार्ग, लोअर परळ, मुंबई - ४०० ०१३, महाराष्ट्र, भारत येथे आहे, यांद्वारे आपल्या ग्राहकांना व संबंधित सर्वांना कळविण्यात येते की, खाली नमूद केलेले कंपनीचे कॉर्पोरेट कार्यालय दिनांक ११ मे २०२६ पासून बंद करून नवीन ठिकाणी स्थलांतरित करण्यात येणार आहे.
सध्याचा कॉर्पोरेट कार्यालयाचा पत्ता (बंद करण्यासाठी प्रस्तावित):
कॉर्पोरेट सेंटर प्रिमायसेस सीएसएल, २०२, दुसरा मजला, अंधेरी-कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व) - ४०००५९, मुंबई, महाराष्ट्र.
नवीन कॉर्पोरेट कार्यालयाचा पत्ता: दुसरा मजला, एएफएल हाऊस, लोक भारती कॉम्प्लेक्स, मारोल-मारोशी रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०००५९.
कुठलीही शंका असल्यास, कृपया customercare@tatacapital.com वर लिहा.
स्थळ: मुंबई
दिनांक: ६ फेब्रुवारी, २०२६
टाटा कॅपिटल लिमिटेडच्या वतीने
अधिकृत स्वाक्षरी

ई - निविदा सूचना - प्रथम मुदतवाढ
सहायक संचालक,
अन्न व औषध प्रशासन प्रयोगशाळा, म.रा.
बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई -५१
दू. क्र. २६५९०९९२. ई मेल- addcl_mum@yahoo.co.in
अन्न व औषध प्रशासन प्रयोगशाळा मुंबईसाठी केमीकल्स/इंडिकेटर ग्लासवेअर, मिडिया, फिल्टरपेपर खरेदी करणेसाठी वार्षिक दर करार करणेबाबत उत्पादक, सोल सेलिंग एजंट, अधिकृत डीलर, सप्लायर, यांच्याकडून ऑनलाईन पद्धतीने दि. २३.०१.२०२६ ते दि. ०२.०२.२०२६ या कालावधीत ई-निविदा प्रणालीद्वारे मागविण्यात आल्या होत्या. त्यास अल्प प्रतिसाद मिळाल्यामुळे सदरची ई निविदा दि. ०२.०२.२०२६ ते दि. ०९.०२.२०२६, दुपारी ०३.०० पर्यंत प्रथम मुदतवाढ देण्यात येत आहे.
सदर कालावधीत बिडींग डाक्युमेंट पाहू शकता व डाउनलोड करू शकता. ई - निविदा http://mahatenders.gov.in या वेबसाईटवर दि.०२.०२.२०२६ ते दि.०९.०२.२०२६, दुपारी ०३.०० पर्यंत (Bid Submission) करू शकता.
दिनांक : ०४.०२.२०२६
ठिकाण : मुंबई
सही/-
सहायक संचालक,
अन्न व औषध प्रशासन प्रयोगशाळा
डीजीआयपीआर. २०२५-२६/५६०२ मुंबई - ५१

डेल्टा मॅन्युफॅक्चरिंग लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय: बी-८७, एमआयडीसी अंबड, नाशिक - ४२२ ०१०
सीआयएन: L32109MH1982PLC028280
दूरध्वनी क्र. २२६१८७४७०० फॅक्स क्र. २२४०७९४७७७ ईमेल आयडी: secretarial@dmltd.in
वेबसाईट: www.deltamagnets.com
समभागधारकांना सूचना
भौतिक प्रतिभूतींच्या हस्तांतरण आणि डीमटेरिअलायझेशन करिता विशेष विंडो
भारतीय प्रतिभुती विनियमन मंडळ ("सेबी") ने त्यांच्या परिपत्रक सेबी / एचओ / ३८ / १३ / ११ (२) २०२६- एमआयआरएसडी - पीओडी / आय / ३७५० / २०२६ दिनांक ३० जानेवारी, २०२६ नुसार, दि. ०१ एप्रिल, २०१९ पूर्वी विकी / खरेदी केलेल्या भौतिक प्रतिभुतींच्या हस्तांतरण आणि डीमटेरिअलायझेशनकरिता विशेष विंडो उघडली आहे. विशेष विंडो दि. ०५ फेब्रुवारी, २०२६ ते दि. ०४ फेब्रुवारी, २०२७ पर्यंत एक वर्षाच्या कालावधीकरिता खुली राहील.
भौतिक समभाग धारण करणारे गुंतवणुकदार त्यांना मंजूर झालेली संधी उपरोल्लेखित परिपत्रकामध्ये उल्लेखिल्यानुसार आवश्यकता / शर्तींचे अनुपालन केल्यानंतर प्राप्त करू शकतात. उपरोल्लेखित परिपत्रक सेबी वेबसाईट म्हणजेच https://www.sebi.gov.in/legal/circulars/jan-2026/ease-of-doing-investment-special-window-for-transfer-and-dematerialisation-of-physical-securities 99411.html वर उपलब्ध आहे.
वरील प्रकरणात कोणतेही प्रश्न असल्यास, भागधारकांनी खाली उल्लेख केल्यानुसार, कंपनी निबंधक आणि भाग हस्तांतरण एजन्ट ("आरटीए") यांना संपर्क करावा.
पूर्वा शेअरजिस्ट्री (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड,
युनिट क्र. ९, तळमजला, शिव शक्ती इंडस्ट्रियल इस्टेट,
जे. आर. बोरीचा मार्ग, लोअर परेल (पूर्व), मुंबई- ४०००११;
दूरध्वनी: २२४९६१४१३२
ईमेल आयडी: support@purvashare.com
डेल्टा मॅन्युफॅक्चरिंग लिमिटेड करिता
सही/-
माधुरी पवार
कंपनी सचिव
एसीएस क्र. ५४६३१
स्थळ: मुंबई
दिनांक: ६ फेब्रुवारी, २०२६

VASANTDADA SUGAR INSTITUTE
Manjari Bk, Tal. Haveli, Dist. Pune.
Ph.: 020-26902100 I Fax : 020-26902244
Website : www.vsisugar.com
E-TENDER NOTICE
We are inviting e-Tender for Proposed Construction of R.C.C.wall around well in S.No. 35 & 36/2 at Nagpur farm, from reputed / registered Government / PWD Civil Contractors of Class - V and above OR having bid capacity equivalent amount of work can apply for tender which is on percentage basis.
**Note :** For Detailed tender notice please Visit **MKCL Website : https://sugarmart.sets.co.in** All right to reject any or all tenders without assigning any reason whatsoever is reserved by VSI.
Director General

भाग हरवल्याची जाहीर सूचना
जेएसडब्ल्यू स्टील लि. नोंद. कार्यालय: जेएसडब्ल्यू सेंटर, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई, महाराष्ट्र ४०००५१, ई-मेल : jswsl.investor@jsw.in दूर.: +९१ २२ ४२८६ १०००
सीआयएन : एल२७१०२एमएच१९९४पीएलसी१५२९२५
याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, देवान चंद वर्मा यांच्याद्वारे धारण केलेले जेएसडब्ल्यू स्टील लि.चे प्रत्येकी रु.१/- च्या ४३० समभागांसाठी फोलिओ क्र. जेएसडब्ल्यू०३११०४७ अंतर्गत असलेले भागप्रमाणपत्र (पत्रे) हरवले/गहाळ झाले आहेत.
भागधारक, श्री. देवान चंद वर्मा यांनी प्रतिलिपी भागप्रमाणपत्र (पत्रे) जारी करण्यासाठी अर्ज केला आहे. सदर भागांवर दावा असलेल्या कोणत्याही व्यक्ती (व्यक्तींनी) त्यांचे दावे कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयामध्ये सदर सूचना प्रसिद्धी दिनांकापासून १५ दिवसांच्या आत कळवावे. असे जर न झाल्यास कायद्यानुसार प्रतिलिपी भागप्रमाणपत्र जारी केल्यापासून प्रतिलिपी भागप्रमाणपत्र जारी करण्यात येतील.

| फोलिओ क्रमांक | भागांची संख्या | प्रमाणपत्र क्रमांक | विशिष्ट क्र. पासून-पर्यंत |
|---|---|---|---|
| जेएसडब्ल्यू०३११०४७ | ४३० दर्शनी मूल्य रु. १/- | २४५३२९२ | २३८२३२०१६१ ते २३८२३२०५९० |

श्री. देवान चंद वर्मा
ए-१/२६० हस्तसाल रोड, उत्तमनगर, नवी दिल्ली ११००५९, ई-मेल आयडी : dcverma@gmail.com
मोबा.: ९५५५५ ४९२०.

ई-निविदा सूचना
सहायक संचालक,
अन्न व औषध प्रशासन प्रयोगशाळा, म.रा.
बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१
दु.क्र. २६५९०९९२, ई-मेल- addcl_mum@yahoo.co.in
अन्न व औषध प्रशासन प्रयोगशाळा, म.रा.साठी Milk चाचणीकरिता लागणारे **Electronic milk Analyzer with Adulteration testing & FTIR based milk & milk product Analyzer** खरेदी करण्यासाठी उत्पादक, सोल सेलिंग एजंट, अधिकृत डीलर, सप्लायर यांच्याकडून ऑनलाइन पद्धतीने दिनांक ०२.०२.२०२६ ते दिनांक १६.०२.२०२६ या कालावधीत दुपारी ०३.०० पर्यंत ई-निविदा प्रणालीद्वारे निविदा मागविण्यात आल्या आहेत.
सदर कालावधीत बिडिंग डॉक्युमेंट पाहू शकता व डाऊनलोड करू शकता.
ई-निविदा http://mahatenders.gov.in या वेबसाइटवर दिनांक ०२.०२.२०२६ ते १६.०२.२०२६ रोजी दुपारी ०३.०० पर्यंत (Bid Submission) करू शकता.
दिनांक : ०४.०२.२०२६
ठिकाण : मुंबई
सही/-
सहायक संचालक,
अन्न व औषध प्रशासन प्रयोगशाळा
मुंबई-५१
डीजीआयपीआर-२०२५-२६/५६०४

ई - निविदा सूचना - प्रथम मुदतवाढ
सहायक संचालक,
अन्न व औषध प्रशासन प्रयोगशाळा, म.रा.
बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई -५१
दू. क्र. २६५९०९९२. ई मेल- addcl_mum@yahoo.co.in
अन्न व औषध प्रशासन प्रयोगशाळा मुंबईसाठी BET चाचणीकरिता लागणारे Lal-Kit खरेदी करणेसाठी वार्षिक दर करार करणेबाबत उत्पादक, सोल सेलिंग एजंट, अधिकृत डीलर, सप्लायर, यांच्याकडून ऑनलाईन पद्धतीने दि. २३.०१.२०२६ ते दि. ०२.०२.२०२६ या कालावधीत ई-निविदा प्रणालीद्वारे मागविण्यात आल्या होत्या. त्यास अल्प प्रतिसाद मिळाल्यामुळे सदरची ई निविदा दि. ०२.०२.२०२६ ते दि. ०९.०२.२०२६, दुपारी ०३.०० पर्यंत प्रथम मुदतवाढ देण्यात येत आहे.
सदर कालावधीत बिडींग डाक्युमेंट पाहू शकता व डाउनलोड करू शकता. ई - निविदा http://mahatenders.gov.in या वेबसाईटवर दि.०२.०२.२०२६ ते दि.०९.०२.२०२६, दुपारी ०३.०० पर्यंत (Bid Submission) करू शकता.
दिनांक : ०४.०२.२०२६
ठिकाण : मुंबई
सही/-
सहायक संचालक,
अन्न व औषध प्रशासन प्रयोगशाळा
डीजीआयपीआर. २०२५-२६/५६०३ मुंबई - ५१

डेल्टा कॉर्प लिमिटेड
नोंदणीकृत कार्यालय: डेल्टा हाऊस, प्लॉट क्र. १२, हॉर्नबाय वेलार्ड इस्टेट, डॉ. ॲनी बेझंट मार्ग, कॉपर चिमणीशेजारी, वरळी, मुंबई- ४०००१८.
सीआयएन क्र. : L65493MH 1990PLC436790 दूरध्वनी क्र.: ९१-२२-४०७९४७००
ईमेल आयडी: secretarial@deltin.com वेबसाईट: www.deltacorp.in
समभागधारकांना सूचना
भौतिक प्रतिभूतींच्या हस्तांतरण आणि डीमटेरिअलायझेशन करिता विशेष विंडो
भारतीय प्रतिभुती विनियमन मंडळ ("सेबी") ने त्यांच्या परिपत्रक सेबी / एचओ / ३८/१३/११ (२) २०२६- एमआयआरएसडीपीओडी / आय/ ३७५० / २०२६ दिनांक ३० जानेवारी, २०२६ नुसार, दि. ०१ एप्रिल, २०१९ पूर्वी विक्री / खरेदी केलेल्या भौतिक प्रतिभुतींच्या हस्तांतरण आणि डीमटेरिअलायझेशनकरिता विशेष विंडो उघडली आहे. विशेष विंडो दि. ०५ फेब्रुवारी, २०२६ ते दि.०४ फेब्रुवारी, २०२७ पर्यंत एक वर्षाच्या कालावधीकरिता खुली राहील.
भौतिक समभाग धारण करणारे गुंतवणुकदार त्यांना मंजूर झालेली संधी उपरोल्लेखित परिपत्रकामध्ये उल्लेखिल्यानुसार आवश्यकता / शर्तींचे अनुपालन केल्यानंतर प्राप्त करू शकतात. उपरोल्लेखित परिपत्रक सेबी वेबसाईट म्हणजेच https://www.sebi.gov.in/legal/circulars/jan-2026/ease-of-doing-investment-special-window-for-transfer-and-dematerialisation-|of-physical-securities_99411.html वर उपलब्ध आहे.
वरील प्रकरणात कोणतेही प्रश्न असल्यास, भागधारकांनी खाली उल्लेख केल्यानुसार, कंपनी निबंधक आणि भाग हस्तांतरण एजन्ट ("आरटीए") यांना संपर्क करावा.
पूर्वा शेअरजिस्ट्री (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड,
युनिट क. ९, तळमजला, शिव शक्ती इंडस्ट्रियल इस्टेट,
जे. आर. बोरीचा मार्ग, लोअर परेल (पूर्व), मुंबई- ४०००११;
दूरध्वनी : २२४९६१४१३२
ईमेल आयडी: support@purvashare.com
डेल्टा कॉर्प लिमिटेड करिता
सही / -
विलिप वैद्य
कंपनी सचिव आणि उपाध्यक्ष सचिवीय
एफसीएस क्र. ७७५०
स्थळ: मुंबई
दिनांक: ६ फेब्रुवारी, २०२६